REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 1 | OCTOBER – 2017



# स्वराज्य पक्षाची स्वातंत्र्य लढ्यामधील भूमिका

मधुकर रामचंद्र साठे[१] , डॉ. शेख ई.एम[२]
[१]संशोधक , डॉ. बा. आ. म.विद्यापीठ औरंगाबाद.
[२]मार्गदर्शक , चिश्तीया महाविद्यालय खुलताबाद, जि. औरंगाबाद.

**प्रस्तावना :**

स्वराज्य पक्षाचा उदय, कार्य व अस्त हा भारतीय स्वातंत्र्य चळवळीमधील एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. बॅ. चित्तरंजनदास हे स्वराज्य पक्षाचे अध्यक्ष तर मोतीलाल नेहरु हे सचिव होते. राष्ट्रसभेने ज्या काळात स्वातंत्र्याचे आंदोलन स्थगित केले होते. त्या काळात स्वराज्य पक्षाने राजकीय चळवळीची मशाल पेटती ठेवली. स्वराज्य पक्षाच्या नेत्यांनी सरकारच्या जुलमी धोरणावर टिका केली. स्वराज्य पक्षाची कायदे मंडळामधील कामगिरी ही अत्यंत विधायक स्वरुपाची होती. स्वराज्याच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी ब्रिटीश राज्यकर्त्यांनी गोलमेज परिषद भरवावी ही सूचना स्वराज्यवाद्यांनीच केली होती. स्वराज्य पक्षाच्या कार्यकर्त्यांनी स्थानिक स्वराज्य पक्षात प्रवेश करुन अत्यंत विधायक स्वरुपाची कामगिरी करुन दाखविली.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये :-**

१)स्वराज्य पक्षाच्या स्थापनेची पार्श्वभूमी - कारणे समजावूण घेणे.
२)स्वराज्य पक्षाच्या ध्येयधोरणांचा मागोवा घेणे.
३)स्वराज्य पक्षाच्या निवडणूकीमधील कामगिरीचा आढावा घेणे.
४)स्वराज्य पक्षाच्या स्वातंत्र्यलढ्यामधील योगदानाचा मागोवा घेणे.
५)स्वराज्य पक्षाच्या ऱ्हासाची कारणमीमांसा समजून घेणे.

**गृहितके :-**

१) असहकार चळवळ स्थगित केल्यामुळे स्वराज्य पक्षाचा उदय झाला आहे.
२) विधीमंडळात प्रवेश करुन स्वराज्याची मागणी करणे हे या पक्षाचे ध्येयधोरण होते.
३) १९२३ च्या केंद्रीय कायदेमंडळाच्या निवडणूकीमध्ये हा केंद्रातील सर्वात मोठा पक्ष बनला होता.
४) सायमन कमीशनची नियुक्ती या पक्षामुळेच झाली होती.
५) राष्ट्रीय सभेच्या तुलनेत स्वराज्य पक्ष व्यापक नव्हता.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे. स्वराज्य पक्षाच्या स्वातंत्र्य लढ्यातील भूमिकेचा आढावा घेण्यासाठी व हे संशोधन अधिकाधिक वस्तूनिष्ठ स्वरुपाचे होण्यासाठी वरील दोन पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे.

**स्वराज्य पक्षाच्या स्थापनेची पार्श्वभूमी :-**

असहकार चळवळ ऐन भरात असताना म. गांधीनी या चळवळीस उत्तरप्रदेशमध्ये चौरीचौरा येथे हिंसक वळण लागले म्हणून ही चळवळ स्थगित करण्याचा निर्णय ५ फेब्रुवारी १९२२ ला घेतला. इतका मोठा निर्णय घेत असताना त्यांनी त्यांच्या समकालीन इतर राजकीय नेत्यांशी चर्चाही केली नव्हती. अचानकपणे असहकार आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय अनेक नेत्यांना आवडला नाही. त्यामध्ये प्रामुख्याने मोतीलाल नेहरु, चित्तरंजन दास, विठ्ठलभाई पटेल यांचा समावेश होता. राजकीय चळवळ ही सतत चालू असली पाहिजे असे मोतीलाल नेहरुंना वाटले होते. तसेच महात्मा गांधीजीना राजद्रोहाचा आरोपावरुन इंग्रजांनी अटक केली होती. त्यामुळे काँग्रेस व जनता दिशाहीन झाले होते. ती नेतृत्वाची पोकळी सामूहिक नेतृत्वाने भरुन काढावी असे मोतीलाल नेहरुंना वाटले होते. त्याच वेळेस १९२२ साली राष्ट्रीय सभेचे अधिवेशन चित्तरंजन दास यांच्या अध्यक्षतेखाली झाले. त्या अधिवेशनामध्ये कौन्सिल प्रवेशाच्या मुद्यावरुन दोन गट पडले होते. तो एक गट म्हणजे निवडणूका लढवून कायदेमंडळात प्रवेश करावा या मताचा फेरवादी गट, तर दुसरा गट म्हणजे कायदेमंळात प्रवेशास नकार देणारा नाफेरवादी गट होय. मोतीलाल नेहरु, चित्तरंजन दास या व्यक्ती फेरवादी गटामध्ये होत्या यांनी काँग्रेसचा राजीनामा देऊन १९२३ मध्ये स्वराज्य पक्षाची स्थापना केली होती.

**स्वराज्य पक्षाची ध्येयधोरणे व कार्यक्रम :-**

मार्च १९२३ मध्ये आलाहाबद येथे स्वराज्य पक्षाची स्थापना करण्यात आली. विधीमंडळात प्रवेश करुन स्वराज्याची मागणी करणे किती आवश्यक आहे हे स्पष्ट करण्यासाठी चित्तरंजन दास व मोतीलाल नेहरु यांची भाषणे झाली. त्यामध्ये त्यांनी असे म्हटले की, ''काँग्रेसपेक्षाही पवित्र असलेली गोष्ट म्हणजे भारतीयांचे स्वातंत्र्य होय व स्वातंत्र्यप्राप्तीसाठी कायदेमंडळामध्ये प्रवेश करणे आवश्यक आहे''. तसचे हा विधीमंडळात प्रवेश करण्याचा कार्यक्रम गांधीजींच्या असहकारितेच्या विरुध्द नाही, त्यानंतर त्यांनी त्या पक्षाचा एक जाहिरनामा घोषीत केला त्यात पक्षाची उद्दिष्ट्ये सांगितली ती पुढीलप्रमाणे आहेत.

१) स्वराज्य पक्ष हा राष्ट्रसभेचाच अविभाज्य भाग आहे. राष्ट्रसभेने स्वीकारलेले अहिंसात्मक असहकाराचे तत्व त्यास मान्य आहे.
२) कायदेमंडळात प्रवेश केल्यानंतर स्वराज्य पक्ष नव्या राज्यघटनेचा आग्रह धरील.
३) सरकार ज्या समित्या स्थापन करते त्यात स्वराज्य पक्ष सहभागी होणार नाही.
४) सरकारी कार्यक्रमावरही स्वराज्य पक्ष बहिष्कार टाकेल.
५) सध्याच्या राज्यघटनेत बद्दल किंवा सुधारणा घडवून आणन्यासाठी पक्ष प्रयत्न करील.
६) महात्मा गांधीजीच्या विधायक कार्यक्रमाचा पक्ष कायदेमंडळाबाहेर सतत पुरस्कार व प्रयत्न करील.
७) स्वराज्याची मागणी कायदेमंडळात स्वराज्य पक्ष सतत करेल.
८) लोककल्याणकारी कायदे पास व्हावेत यासाठी स्वराज्य पक्ष सतत प्रयत्न करील.
९) तत्कालीन ब्रिटीश शासनपध्दतीचा शेवट करील.

अशाप्रकारे स्वराज्यपक्षाची ध्येयधोरणे व कार्यक्रम होता.

**स्वराज्य पक्षाची स्वातंत्र्य लढ्यामधील भूमिका :-**

स्वराज्य पक्षाची स्थापना झाल्यानंतर १९२३ मध्ये केंद्रीय कायेदमंडळाच्या निवडणूकीत १४५ पैकी ४८ जागा जिंकल्या. स्वराज्य पक्ष हा केंद्रातील सर्वात मोठा पक्ष असला तरी या पक्षाचे बहुमत नव्हते. केंद्रीय कायदेमंडळात २४ अपक्ष सभासद होते. त्यांचे नेतृत्त्व बॅ. जीना यांच्याकडे होते. केंद्रीय कायदेमंडळामध्ये स्वराज्य पक्षाने स्वतंत्र्य सभासदांशी समझोता करुन संयुक्त आघाडी स्थापन केली होती. शासकीय विधेयके व ठराव उधळून लावणे व राष्ट्रीय विकासाच्या उपयुक्त ठराव पास करण्याकरिता सरकारला पाठिंबा देणे हे या आघाडीचे धोरण होते. स्वराज्यवादी पक्ष व स्वतंत्र सभासद यांच्यामधील हे सहकार्य दोन वर्षे टिकून होते.

स्वराज्य पक्षाने केंद्रीय कायदेमंडळात अत्यंत महत्त्वाचे कार्य केले. ८ फेब्रुवारी १९२४ रोजी पं. मोतीलाल नेहरु यांनी केंद्रीय कायदेमंळात ठराव मांडला की, ''हिंदुस्थानात जबाबदार शासनपध्दती स्थापन करण्याच्या दृष्टीने सन १९१९ चा कायदा दुरुस्त केला जावा. त्यासाठी विलायत सरकारने हिंदी प्रतिनिधींशी चर्चा करण्यासाठी गोलमेज परिषद भरवावी आणि अशा परिषदेमधील प्रतिनिधींनी केलेल्या शिफारशीवर आधारित नवा सुधारणा कायदा ब्रिटीश संसदेने पास करावा''. इंग्लडचा पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड याने ही मागणी फेटळल्याने स्वराज्य पक्षाचे नेते नाराज झाले होते. तसेच Regulation III of १८१८ या व्यक्तीस्वतंत्र्याची पायमल्ली करणाऱ्या कायद्याचे उच्चाटन व्हावे यासाठी स्वराज्य पक्षाने केंद्रीय कायदेमंडळामध्ये ठराव आणला व त्यावर चर्चा करुन हिंदी लोकांवर कसे अत्याचार होतात हे दाखवून दिले. त्यानंतर स्वराज्य पक्षाने स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका जिंकल्या होत्या. त्यामध्ये मुंबई, कलकत्ता, अलाहाबाद इत्यादी ठिकाणच्या कॉर्पोरेशन्स या पक्षाच्या ताब्यात आल्या. कलकत्ता कॉर्पोरेशनचे अध्यक्ष चित्तरंजन दास हे होते व सुभाषबाबू हे मुख्य कार्यकारी अधिकारी होते. पं. जवाहरलाल नेहरु हे अलाहाबाद म्युन्सिपल बोर्डाचे अध्यक्ष होते. या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थानी या पक्षाच्या नेत्यांच्या नेतृत्वाखाली लोककल्याणकारी कार्य केले होते.

स्वराज्य पक्षाने कायदेमंडळामध्ये जनहिताचे अनेक प्रश्न मार्गी लावले. या पक्षाच्या दबावामुळे सरकारने परदेशी भांडवलाच्या गुंतवणूकीची चौकशी करण्यासाठी समिती नेमली. कॉटन एक्साइट ड्युटी रद्द केली. मिठावरील कर रद्द केला. स्वराज्य पक्षाने परदेशामधील हिंदी लोंकावरील अन्याय दूर व्हावा. देशी उद्योगधंद्याना संरक्षण मिळावे, रेल्वेमधील वंशभेद दूर व्हावा इ. स्वरुपाच्या मागण्या करुन त्या प्रश्नाकडे ब्रिटीशांचे लक्ष वेधले. त्याचप्रमाणे सरकारचे जे जे कायदे जुलमी व अन्यायकारक होते त्यांना विरोध करण्याचे कार्य या पक्षाने केले होते.

स्वराज्यप्राप्ती या अंतिम ध्येयासाठी हा पक्ष प्रयत्नशील होता. भारताला स्वराज्याचा हक्क दिल्याशिवाय देशाचा विकास होणार नाही असा या पक्षाचा युक्तीवाद होता. या पक्षाच्या प्रयत्नामुळेच सरकारने मुडियन समितीची नियुक्ती केली. या समितीने सादर केलेल्या अहवालानुसार भारतामधील राजकीय परिस्थितीची पाहणी करण्यासाठी १९२७ मध्ये सरकारने सायमन कमीशन नियुक्त केले. सायमन कमिशनची नियुक्ती हे स्वराज्य पक्षाच्याच कार्याचे फळ होय. कारण त्यांनी केलेल्या आंदोलनामुळे व चळवळीमुळे हे ध्येय साध्य झाले होते.

१९२२ ते २७ या काळामध्ये स्वराज्य पक्षाने राष्ट्रीय चळवळ जागृत ठेवली. १९२२ साली असहकार चळवळ तहकूब झाली होती. आणि त्याचवेळेस राजद्रोहाच्या आरोपाखाली गांधीजीना सहा वर्षाचा तुरुंगवास झाला. त्यावेळेस काँग्रेस नेतृत्वहीन झाली होती व राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळसुध्दा नेतृत्वहीन झाली होती. याच काळात स्वराज्य पक्षाने जर राष्ट्रीय चळवळीला नेतृत्व देण्याचे काम केले नसते किंवा याकाळात स्वराज्य पक्ष नसता तर राष्ट्रीय चळवळ एकदम थंडावली असती. या पक्षाचे राष्ट्रीय चळवळीस गती देण्याचे काम यशस्वीपणे केले यात शंकाच नाही.

**सारांश :-**

स्वराज्य पक्षाची प्रस्तुत ध्येयधोरणे, कार्यक्रम आणि स्वातंत्र्य लढ्यामधील भूमिकेच्या अभ्यासांती असे लक्षात आले की गांधीवादामध्ये आणि स्वराज्यवाद्यामध्ये मूलभुत फरक नव्हता. स्वराज्यवाद्यांनी म्हटले होते. सत्याग्रहाशिवाय नौकरशाही, हुकुमशाही प्रवृत्तीला आळा घालणे शक्य आहे असे आम्हास वाटले तेव्हा जनतेची तयारी नसली तरीही आम्ही विधिमंडळाच्या सदस्यत्वाचे राजीनामे देऊन गांधीजीच्या नेतृत्त्वाखाली

सत्याग्रह करण्यास तयार राहू व संघटीतरित्या सत्याग्रहाचा कार्यक्रम यशस्वी करु. असे असले तरी त्यांचे स्वातंत्र्य लढ्यामधील योगदान काही कमी नव्हते.

**संदर्भ सूची :-**

१) डॉ. गाठाळ एस.एस. (२००४) :- भारताचा इतिहास (इ.स. १७५० ते १९५०), कैलाश पब्लीकेशन्स, औरंगाबाद. पृष्ठ क्र. ३८१.
२) इंडियन नॅशनल कॉंग्रेस :- रिपोर्ट ॲन्युअल सेशन्स, १९२२.
३) देशपांडे प्र.न. :- आधुनिक भारताचा इतिहास (इ.स. १७५० ते १९५०), विद्या बुक पब्लीशर्स, औरंगाबाद, पृष्ठ क्र. १५२.
४) श्रीशरण :- महामानव नेहरु, विक्रम प्रकाशन दिल्ली, पृष्ठ क्र. ३५.
५) Young Pauline V. :- Scientific social survey and Research, Bombay P.K. ४४.